**Peer Reviewed Referred**
**and UGC Listed Journal**
**(Journal No. 40776)**

ISSN 2277-5730

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY**
**QUARTERLY RESEARCH JOURNAL**

# AJANTA




**Valume-VI, Issue-IV**
**Marathi Part - I**
**October - December - 2017**

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2016 - 4.205**
**www.sjifactor.com**




**AJANTA**
**PRAKASHAN**

Scanned with OKEN Scanner

# मराठी अनुक्रमाणिका भाग - १



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | वस्तू आणि सेवा कर : एक दृष्टिकोन<br>**जी. एस. मेश्राम** | ५३-५५ |
| १५ | उएऊ आणि सामान्य व्यक्ती<br>**प्रा. होदलूरकर एन. व्ही.** | ५६-६० |
| १६ | उएऊ करप्रणाली सामान्य जनता आणि सुरक्षा<br>**इंदिरा रजेसिंग गिरासे**<br>**प्रा. डॉ. के. बी. कदम** | ६१-६३ |
| १७ | भारतीय अर्थव्यवस्थेवर जी. एस. टी. चा प्रभाव<br>**डॉ. जयमाला एल. रामटेके** | ६४-६७ |
| १८ | उएऊ सुधारणा फायदे आणि तोटे<br>**डॉ. काशीद एस. व्ही.** | ६८-७१ |
| १९ | जी.एस.टी. चा सामान्य माणसावरील परिणाम<br>**डॉ. लाजवंती टेंभुर्णी (रामटेक)** | ७२-७५ |
| २० | वस्तू व सेवा कर प्रणाली आणि त्याचा ग्राहकावर परिणाम<br>**डॉ. महावीर एन. सदावर्ते** | ७६-८० |
| २१ | वस्तू व सेवा कराचा भारताच्या आर्थिक वृध्दिवर परिणाम<br>**श्रीमती. प्रा. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर** | ८१-८३ |
| २२ | जीएसटी आणि सामान्य लोक<br>**डॉ.संजय गव्हाणे**<br>**श्री.नागनाथ शशिकांत कबाडे** | ८४-८८ |
| २३ | भारतीय आर्थिक विकास आणि जीएसटी : एक चिकीत्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. नामदेव सानप** | ८९-९२ |
| २४ | सर्वसामान्य व्यक्तिवर जी.एस.टी.चा प्रभाव<br>**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे** | ९३-९७ |
| २५ | वस्तू व सेवा कर आणि राज्यसरकार<br>**प्रा. प्रशांत नामदेव इंगोले** | ९८-१०१ |
| २६ | जीएसटी आणि सामान्य लोक<br>**प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर** | १०२-१०५ |





Scanned with OKEN Scanner

# २१ वस्तू व सेवा कराचा भारताच्या आर्थिक वृध्दिवर परिणाम

श्रीमती. प्रा. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता.कळंब, जि. उस्मानाबाद.

## प्रास्ताविक

स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने आर्थिक विकासाला सुरुवात झाली आणि १९९१ ला नवीन आर्थिक धोरण भारताने स्विकारले. त्यामध्ये खाजगीकारण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाला सुरुवात झाली. त्यामुळे एकंदरीत देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडुन आली. आज जगाच्या एकुण लोकसंख्येपैकी १७.८६% लोकसंख्या भारतात राहते. जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमोंक लागतो. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न खूप गंभीर असल्यामुळे भारताला दारिद्रय, बेकारी, आरोग्य इत्यादी अनेक समस्यांनी उग्र रुप धारण केले आहे. तेव्हा ८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून म्हणजे ९ नोव्हेंबरचा दिवस सुरु झाल्यापासुन चलनातुन पाचशे, हजार रुपयोंच्या नोटा चलनातुन बंद करण्यात आल्या व १ जुलै २०१७ ला जीएसटी आमलात आला. त्याचे भारताच्या आर्थिक वृध्दीवर अनुकुल व प्रतिकुल परिणाम झालेले दिसुन आले.

## जीएसटीचा इतिहास

जगात १६५ देशांनी आतापर्यंत GST आमलात आणला आहे. जागतिक स्तरावर सर्वप्रथम १९५४ मध्ये फ्रान्सने जीएसटी लागू केला. ज्यानंतर कॅनडा, ब्राझील इत्यादी देशाने जीएसटी लागु केला आणि मोठया प्रयत्नाने सध्याच्या NDA सरकाने १ जुलै २०१७ रोजी भारतामध्ये जीएसटी अधिनियम पारित करुप पूर्ण भारतभर लागु केला. तब्बल १६ वर्षा च्या प्रयत्नानंतर देशात GST आमलात आला. पूर्वीच्य कररचनेत अतिशय गुंतागुंत होती आणि जीएसटी मुळे त्यात सूधारणा होऊन कररचना सुलभ झालेली आहे. पुर्वी कर दर ३६% होता. तो GST मुळे सध्या १८% ते २८% च्या दरम्यान आहे. त्यामुळे उत्पादनात स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा वाढेल आणि त्याचा फायदा सर्वसामान्य जनतेला होईल.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक आर्थिक क्रांतीची सुरुवात आता एक देश, एक कर, एक बाजारपेठ असा केंद्राचा क्रांतीकारी निर्णय, भारताच्या राजस्व इतिहासात दि. ३ ऑगस्ट २०१६ हा दिवस मानावा लागेल. कारण ६ मे २०१५ रोजी लोकसभेत मान्य झालेले घटना दुरुस्ती विधेयक राज्यसभेत संयुक्त समितीच्या अहवालातील सर्व शिफारशीवर चर्चा करुन दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी द्रमुक चाअपवाद वगळता पूर्ण हुमताने मान्य झाले. GST म्हणजे वस्तु व सेवा कर हे कर कायदा विधेयक १ जुलै २०१७ पासुन संपूर्ण भारतभर आमलात आणले. केंद्रीय वस्तु व सेवाकर कायद्यात एकंदरीत २१ चॅप्टर्स, १७४ कलमे, आणि ३ परिशिष्टये आहेत. स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी कर सूधारणा चळवळ म्हणून क्र्च्र ला ओळखले जाते. GST हे १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक आहे. हे विधेयक देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण आहे. कारण क्र्च्र च्या माध्यमातुन संपुर्ण देशात एकच करप्रणालीचा अस्तीत्वात आली आहे. त्यामुळे करावरील कर हा परिणाम (Tax on tax or cascading effect) नष्ट होण्यास मदत होईल क्र्च्र अनुकुल व प्रतिकुल परिणाम पुढीलप्रमाणे पाहता येईल.

## आभ्यासाची उद्दिष्टये

१) वस्तु व सेवा कराचा क्र्च्र समग्र पातळीवर सखोल अभ्यास करणे.

२) वस्तु व सेवा कराचा भारताच्या आर्थिक वृध्दिदरावरील परिणाम अभ्यासणे.

३) वस्तु व सेवा करासाठी आवश्यक असलेल्या बार्बीचा अभ्यास करणे.

## गृहितके

१) GST विधेयक मंजुर झाल्यामुळे करप्रणाली मध्ये पारदर्शकता वाढेल.

२) GST मुळे कर चुकवेगिरीला आळा बसेल .



Scanned with OKEN Scanner

३) वस्तु व सेवा कर गोळा करण्यासाठी जो खर्च येतो तो कमी होईल.

४) वस्तु व सेवा करामुळे भारताचा आर्थिक वृध्दिदर वाढेल.

५) वस्तु व सेवा करामुळे एका आर्थिक भारताची निर्मिती होईल.

६) एक देश, एक कर, एक बाजारपेठ हे मिशन साध्य होऊन करांमध्ये सुसुत्रता येईल.

**वस्तु व सेवा कराचा भारताच्या आर्थिक वृध्दीवर परिणाम**

१ जुलै २०१७ रोजी (GST ) वस्तु व सेवा कर प्रत्यक्षात आमलात आला आहे. आणि आज जगात १६६ वा देश म्हणुन GS विधेयकाला मंजुरी देणारा देश म्हणून भारत देश ठरला आहे. एक राष्ट्र, एक कर, एक बाजार याच्या माध्यमातून एका नव्या भारताची निर्मि होत आहे. अशा या वस्तु व सेवा कराच्या माध्यमातुन भारताच्या आर्थिक वृध्दीवर काही अनुकुल व काही प्रतिकुल अशा प्रकारचे परिणा दिसून येतात. तो पुढीलप्रमाणे.

GST आमलात आल्यानंतर भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न तब्बल ३,०२,००० कोटी. रुपयांनी वाढण्याची शक्यता आहे त्यासाठी कुठलीही अतिरिक्त गुंतवणूक करावी लागणार नाही. तसेच जीएसटी मुळे केंद्र व राज्य सरकारने २६ कर संपूष्ठात येणार आहे. उत्पादन शूल्क, व्हॅट व एन्ट्री टॅक्स स्थानिक कर सुध्दा असणार आहेत. त्याचबरोबर जीएसटीचा दर उत्पादक ठोक व्यापारी व किरकोळ व्यापारी या सर्वासाठी देशभर एकच राहणार आहे.

GST आमलात आल्यामुळे वसुली एकाच विभागाद्वारे होईल. यामुळे उत्पादन खर्चात किमान दोन टक्क्यांनी घट होऊन उदयोग क्षेत्रात क्षमता व जीएसटी आल्यामुळे केंद्र व राज्य सरकारचे अप्रत्यक्ष करांपासुन मिळणारे उत्पन्न वाढणार आहे. पुर्वी कर चुकवेगिरीमुळे अनेक व्यवहार नोंदवले जात नव्हते. परंतु जीएसटी आल्यामुळे आधि भरलेल्या कराचा सेट ऑफ/ रिंफंड मिळविण्यासाठी व्यवहार करप्रणालीत उघड करावाच लागणार आहे. त्याचबरोबर करांवर कर आकारणी होणार नसल्याने व्यापाऱ्यांनी केलेला मुल्य वर्धनावर (नफयावर) केवळ जीएसटी आकारला जाईल. त्यामुळे व्यापाऱ्यांना कर भरणा करण्यास प्रोत्साहन मिळेल व कर महसूल वाढेल.

या सर्वामुळे वस्तु, उत्पादनांची मागणी वाढेल व परिणामी औद्योगिक उत्पादन वाढुन जीडीपीसुध्दा २ % नी आपोआप वाढण्याची शक्यता आहे. जीएसटी चे करदर जाहीर झाले आहेत. या करप्रणालीचा सर्वात जास्त फायदा गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांना होणार असून महागाई कमी होण्याच्या दिशेंने महत्वाचे पाऊल आहे. यामध्ये करदराचे ५ ठप्पे आहेत.

काही वस्तुवर ०% कर आकारण्यात येईल. त्याशिवय ५% , १.२%, १८% आणि २८% आणखी चार टप्पे असतील. चैनीच्या वस्तुवर आणि मद्य, सिगारेट सारख्या वस्तुवर सर्वात जास्त कर आकारण्यात येणार आहे. GST करप्रणालीमुळे बिस्किटे, चॉ टे, केशतेल, साबण, टुथपेस्ट, T.V. प्राथमिक स्मार्ट फोन, सिमेंट, चहा, कॉफी, साखर, चित्रपट तिकीटे, नाटकाची तिकीटे, प्राथमिक कार, दुचाकी, खाजगी टॅक्सी सेवा, दुध, धान्ये, भाज्या, फळे, मिठाई, खते इत्यादी वस्तु व सेवा स्वस्त होणार आहेत.

याउलट जीएसटी मुळे मोबाईल बिल, आयुर्विमा पॉलिसी, बँकिग सेवा, वायफाय सेवा, डीटीएच सेवा, तिकीटाचे ऑनलाईन बुकिंग, घरभाडे, कुरिअर सेवा, मेट्रोचा प्रवास, शाम्पु, उत्तरे, सोने , सिगारेट, पान मसाला, घडपाळ सुखा मेवा, इलेक्ट्रिक हॉट प्लेट, प्लॉस्टिक वस्तु इत्यादी वस्तु व सेवा महाग होणार .

जीएसटी मुळे वाढता व्यापार उत्पादन व रोजगार यामुळे सरकारच्या करमाध्यमातुन काही अंतराने लक्षणीय वाढ होईल. तसेच देशाच्या राष्ट्रीय उत्पान्नत सहाजिकच वाढ होईल कारण वाढत्या. व्यापारामुळे गुंतवणुक, उत्पादन व रोजगार वाढणार आहे. विशेष म्हणजे व्यवसाय कर भरण्याची सोईस्करता वाढणार आहे. या सर्वाचा परिणाम म्हणुन राष्ट्रीय उत्पन्न वृध्दीचा दर सुरवातीला अल्पप्रमाणात २ ते ३ वर्षात किमान २% पेक्षा अधिक वाढेल.

परंतु आर्थिक वर्षे २०१६-२०१७ च्या चौथ्या तिमाहीत भारताच्या GDP ६.१ होता त्यात घट होऊन तो ५.७% पर्यत कमी झाला. सर्वसामान्य नागरिकांना उपयुक्त आहे. तसेच व्यापार व उदयोगासाठी फायदेशीर आहे. अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर आहे. सुलभ कर



Scanned with OKEN Scanner

...रचना आणि सुलभ करव्यवस्था आहे. आणि एका आर्थिक भारताची निर्मिती होत आहे. त्यामध्ये वस्तु व सेवांच्या गतीला मोकळीक मिळत आहे. वाढत्या स्पर्धेमुळे ग्राहकांना लाभ मिळत आहे. आणि देशभरात उत्पादक व ग्राहकांकरिता समान स्तरावरील संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीयत्व व एकात्मतेच्या भावनेस बळकटी येत आहे.

जीएसटी मुळे शेती उत्पादनासाठी लागणारी खते, बियाणे, यांत्रिक साधने यासारख्या आदनांच्या किमती पूर्वीच्या तुलनेने काही प्रमाणात कमी होऊ शकतील. परिणामी शेती क्षेत्राचा उत्पादन खर्च कमी होण्यास व शेती व उद्योग यातील व्यापारशर्ती या शेतीला अधिक सोयीच्या होण्याची शक्यता वाटत आहे.

जीएसटीमुळे सेवांच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. कारण जीवन विमा, आरोग्य विमा आणि वाहन विमा यांच्यासाठी अधिक खर्च होईल. याचे कारण म्हणजे, यावरील कराचे प्रमाण वाढलेलें आहे.

अशाप्रकारे जीएसटीमुळे अनेक वस्तु स्वस्त तर काही वस्तु महाग झाल्या आहेत. जीएसटीचा निर्णय अत्यंत आनंदाची बाब असुन केवळ उदयोगक्षेत्रालाच नाही तर संपुर्ण देशाला या निर्णयाचा लाभ होणार असुन त्यामुळे अधिक प्रगती होईल. मात्र या निर्णयाची फळे दिसण्यासाठी काही काळ प्रतिक्षा करवी लागेल. जगातील अन्य देशाच्या तुलनेत भारताच्या प्रगतीचा आलेख उंचावत आहे. अशा परिस्थितीत निर्णयामुळे देशाला अधिक चांगला लाभ होईल. अशी आशा आहे.

## निष्कर्ष

१) जीएसटी विधेयकाचा कृषी क्षेत्रावर अनुकूल परिणाम होत असताना दिसून येत आहे. कारण बी-बियाणे, खते यावरील कर कमी करण्यात आला आहे.

२) जीएसटी विधेयकामुळे सेवा क्षेत्रातील कर वाढल्यामुळे सेवा क्षेत्रावरील उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.

३) जीएसटी सर्व नागरिकांना, उदयोग व व्यापरांना लाभदायक ठरत असल्याचे दिसून येते.

४) जीएसटी विधेयकामुळे देशाची आर्थिक वृध्दी ६.१ होती ती सध्या ५.७% एवढी घट झालेली आहे. म्हणजेच जीएसटी मुळे आर्थिक वृध्दीदरात घट झालेली दिसुन येते.

५) कररचनेची गुंतागुंत संपुष्ठात आली आहे.

६) केंद्र सरकारच्या महसुलात मोठया प्रमाणात जीएसटीमुळे वाढ होत आहे.

अशा प्रकारे जीएसटी विधेयक मंजुर झाल्यामुळे भारताच्या आर्थिक वृध्दीवर त्याचे काही चांगले तर काही विपरीत परिणाम आपल्याला पहायला मिळणार आहेत. परंतु भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या क्रांतीकारी इतिहासात अतिशय अमुलाग्र असा बदल कररचनेत करुन उज्जवल भविष्यासाठी एक उचलेला दमदार पाऊल म्हणजेच जीएसटी होय. यालाच वस्तु व सेवा कर असे म्हणतात.

## संदर्भग्रंथ

१) वस्तु व सेवाकर — मंगेश सिरसाट व निवृत्ती नानवटे

२) लोकमत पेपर ५ ऑगस्ट २०१६

३) असा आहे जीएसटी कायदा — ॲड. गोविंद पटपर्धन

४) चाणक्य मंडल ऑगस्ट २०१७ ( मासिक )

५) व्यापारी मित्र सप्टेंबर २०१७

६) स्पर्धा मित्र ऑगस्ट २०१७

७) उदयोजक ऑगस्ट २०१७

८) www. NDTV. INDIA. Com



Scanned with OKEN Scanner